वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ,
परभणी

क्रमांक २०२१/प्र.क्र.-४० /आस्था-८
दिनांक : ३१/०३/२०२१

प्रति,

१. संचालक शिक्षण/ संशोधन/ विस्तार शिक्षण, वनामकृवि,परभणी.
२. विद्यापीठ अभियंता, वनामकृवि, परभणी.
३. नियंत्रक, वनामकृवि, परभणी.
४. सहयोगी अधिष्ठाता (शिक्षण), वनामकृवि,परभणी
५. उपकुलसचिव (आस्था/साप्रवि/विद्या विभाग), वनामकृवि, परभणी

विषय : कोरोना विषाणूंचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याच्या अनुषंगाने शासकीय कार्यालये बंद करण्याबाबत.

संदर्भ : जिल्हादंडाअधिकारी, परभणी यांचे पत्र क्र.२०२०/गृह/अे-१/पोल/कावि/ दिनांक ३१.०३.२०२१

विषयांकीत प्रकरणी कोरोना विषाणूंचा (कोव्हीड-१९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी मा. जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाअधिकारी, परभणी यांनी संदर्भीय पत्रानुसार सर्व शासकीय / निमशासकीय कार्यालये दिनांक ०१.०४.२०२१ ते ०४.०४.२०२१ या कालावधीत बंद ठेवण्याचे आदेश दिले आहेत.

त्यानुषंगाने कळविण्यात येते की, अत्यावश्यक सेवांतर्गत येणारे आरोग्य विभाग ,पाणी पुरवठा विभाग,विद्युत विभाग, सुरक्षा विभाग,संकरीत गो-पैदास प्रकल्प, दुग्धशास्त्र व पशुपालन विभाग तसेच ज्या प्रक्षेत्रावर पशुपालनाच्या दृष्टीने करण्यात येणाऱ्या व्यवस्थेबाबतची कार्यालये तसेच पीक काढणी सुरु असलेली प्रक्षेत्र वगळून परभणी मुख्यालय अंतर्गत येणारी कार्यालये दिनांक ०१.०४.२०२१ ते ०४.०४.२०२१ या कालावधीत बंद ठेवण्यात यावीत.

मा.कुलगुरु यांच्या मान्यतेने,

कुलसचिव

प्रत :
मा.कुलगुरु यांचे खाजगी सचिव, वनामकृवि, परभणी.